# नियमित दिवाणी दावा ४६/२००८ मधील नि.क्र.२४७ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज सि.पी.सी. ऑ.६ रुल १७ प्रमाणे दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा दावा खरेदीपत्र रद्द होऊन मिळणेबाबत, मालकी हक्काबाबत, कब्जाबाबत व निरंतरचे ताकिदीबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ मोहन धोंडीराम जगदाळे हे मयत झालेनंतर वादीने सदरहु मयत प्रतिवादी क्र. १ चे सर्व कायदेशीर व जवळचे वारस रेकॉर्डवर आणलेले आहेत. सदर वारसांपैकी प्रतिवादी क्र. १अ) ते १इ) यांना दावा समन्सची बजावणीसुध्दा झालेली आहे. परंतु सदर वारसांपैकी प्रतिवादी क्र. १ई) पुजा मोहन जगदाळे हिला दावा समन्स काढले असता सदर व्यक्तीशी प्रतिवादी क्र. १ चा कोणताही संबंध नसलेबाबतचा रिपोर्ट बेलिफामार्फत आलेनंतर वादीने सदरील प्रतिवादी क्र. १ई) हिची चौकशी केली असता सदरील प्रतिवादी क्र. १ई) पुजा मोहन जगदाळे हिचे नाव पुजा नसुन राणी असलेबाबत माहिती वादीला झाली. सदर दाव्याचे कामी प्रतिवादीचे कॉलममध्ये १ई) पुजा मोहन जगदाळे यामधील ' पुजा ' या नावास काट देऊन त्याऐवजी त्याठिकाणी ' राणी ' असे लिहीणेची विनंती केली.

३. दाव्याचे अवलोकन केले असता वादींनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द खरेदीपत्र रद्द होऊन मिळणेबाबत, मालकी हक्काबाबत, कब्जाबाबत व निरंतरचे ताकिदीबाबत दाखल केला आहे. वादीच्या सदर अर्जाचे अवलोकन केले असता सदर दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असुन सदर दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणत्याही

प्रकारचा बदल होणार नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करावी.

३. संबंधित कारकून यांनी सदर दुरुस्तीची नोंद दावा नोंदणी रजिस्टरमध्ये व संगणकीय प्रणालीमध्ये दुरुस्ती करुन घ्यावी.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

५. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2022.07.13 17:25:40 +0530

आटपाडी. **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक– १३/०७/२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 13.07.2022
Order signed by the
Presiding Officer on - 13.07.2022
Order uploaded on - 13.07.2022